वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३

२) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र काम/२/कावि/२२/२०१७ दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय

३) आदेश क्र. लेखा/३/कावि/१३३/२०२० दि. १८/०५/२०२०

४) भारत सरकार,वित्त विभागाचे पत्र क्र. १/१/२०२३- E.II(B) दि.३/४/२०२३

५) कर्मचारी महासंघ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि. ५ / ४/२०२३ चे पत्र

६ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ८/ १० / २०१८ चा मान्य प्रस्ताव

७ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ५ / ४ / २०२३ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/३०५ /२०२३
दिनांक :- १३ / ४ /२०२३

**विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०२३ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...**

**आदेश,**

केंद्रशासनाच्या वित्त मंत्रालय खर्च विभागाकडील ज्ञापन क्रमांक १/१/२०२३ E.II(B) दि.३/४/२०२३ अन्वये केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०२३ पासून ३८ टक्के वरुन ४२ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०२३ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा.नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जानेवारी २०२३ पासून सातवा वेतन आयोगानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता ३८ टक्के

ऐवजी ४२ टक्के लागू करण्यात येत आहे. माहे एप्रिल २०२३ चे वेतन व पेन्शन बिल ४२ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. माहे जानेवारी २०२३ ते माहे मार्च २०२३ अखेरची महागाई भत्त्याची थकबाकी माहे एप्रिल २०२३ चे वेतन देयके / पेन्शन देयका बरोबर काढण्यात यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी

प्रति,

सर्व संबंधित विभाग प्रमुख

(जितेंद्र कोळंबे )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी